मालेगाव शहर महानगरपालिका, मालेगाव

प्रेस नोट क्र.

जाहीर आहवान

(मा. उच्च न्यायालय, मुंबई सुमोटो जनहित याचिका क्र. ०१/२०२६ अन्वये)

मालेगाव शहरातील सर्व नागरिक, सार्वजनिक मंडळे, आयोजक, साऊंड सिस्टीम/डीजे चालक-मालक व फटाके विक्रेते यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, सण-उत्सवांच्या काळात ध्वनीक्षेपक व फटाक्यांच्या अनियंत्रित वापरामुळे होणाऱ्या वायू व ध्वनी प्रदूषणाचा ज्येष्ठ नागरिक, रुग्ण, विद्यार्थी व लहान मुलांच्या आरोग्यावर गंभीर दुष्परिणाम होतो. यास्तव मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी सुमोटो जनहित याचिका क्र. ०१/२०२६ मध्ये दिलेले आदेश वर्षभर व सर्व सण-उत्सवांना लागू असून त्यांचे काटेकोर पालन करणे सर्वांवर बंधनकारक आहे :-

१. **सार्वजनिक ठिकाणी फटाके फोडण्यास संपूर्ण बंदी :** सार्वजनिक रस्ते, गल्ल्या, पदपथ व चौकांमध्ये फटाके फोडण्यास पूर्णतः बंदी आहे. उल्लंघन करणाऱ्यांवर तात्काळ गुन्हा दाखल करून मुद्देमाल जप्त करण्यात येईल.

२. **शांतता क्षेत्र :** सर्व रुग्णालये, शाळा-महाविद्यालये, न्यायालये, धार्मिक स्थळे व विशेष घोषित ठिकाणांच्या १०० मीटर परिघात ध्वनीक्षेपकांचा वापर व फटाके वाजविण्यास कडक प्रतिबंध आहे.

३. **ध्वनीक्षेपक व साऊंड सिस्टीम :** सक्षम प्राधिकाऱ्याच्या लेखी परवानगीशिवाय ध्वनीक्षेपक/साऊंड सिस्टीम वापरता येणार नाही. परवानाधारकांनी कार्यक्रमाच्या ठिकाणी 'डेसिबल मीटर' बसविणे व साऊंड सिस्टीममध्ये 'इंटरनल साऊंड लिमिटर' जोडल्याचे प्रतिज्ञापत्र देणे सक्तीचे आहे. ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० नुसार रात्री १०.०० ते सकाळी ६.०० या वेळेत ध्वनीक्षेपक वापरण्यास मनाई आहे.

४. **ध्वनी मर्यादा :** ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० अन्वये विहित ध्वनी मर्यादा खालीलप्रमाणे आहेत :-

अ.क्र.	क्षेत्र	दिवसा (स. ६ ते रा. १०) डेसिबल dB(A)	रात्री (रा. १० ते स. ६) डेसिबल dB(A)
१	औद्योगिक क्षेत्र	७५	७०
२	वाणिज्य क्षेत्र	६५	५५
३	निवासी क्षेत्र	५५	४५
४	शांतता क्षेत्र	५०	४०

५. **कारवाई :** नियमभंग झाल्यास संबंधित साऊंड सिस्टीम/डीजे/वाद्ये तात्काळ जप्त करून जप्त मुद्देमालासह पोलीस प्रशासनामार्फत कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

६. **हरित फटाके :** नागरिकांनी केवळ हरित फटाक्यांचा (Green Crackers) मर्यादित वापर करावा. फटाके विक्रेत्यांनी केवळ हरित फटाक्यांची विक्री करावी.

७. **फटाक्यांची वेळ :** ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० नुसार आवाज करणारे फटाके रात्री १०.०० ते सकाळी ६.०० या वेळेत फोडण्यास संपूर्ण मनाई आहे.

८. **लेझर लाईट :** लेझर लाईट, उच्च तीव्रतेचा प्रकाश असणारे विद्युत दिवे व थीम लाईट्स यांचा उत्सव व मिरवणुकांमध्ये वापर करण्यास संपूर्ण मनाई आहे.

तक्रार निवारण कक्ष (२४x७)

वरील आदेशांचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यास नागरिकांनी खालील ठिकाणी तक्रार नोंदवावी. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल.

बाब	तपशील
नोडल अधिकारी (नाव व पदनाम)	श्री. नवल सोमा खैरनार, प्रभारी सहाय्यक आयुक्त (कर)
नोडल अधिकारी मोबाईल क्रमांक	८४५९३५६८१२
हेल्पलाईन क्रमांक (२४x७)	(०२५५४) २३४५६७
तक्रार कक्षाचे ठिकाण	अग्निशमन अधिकारी तथा, मुख्य अग्निशमन केंद्र, महेश नगर, छ. शिवाजी महाराज पुतळा, मालेगाव जि. नाशिक. तसेच प्रभाग कार्यालय क्र. ०१ ते ०४, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव.
मुख्य ई-मेल आयडी	mlgmmc@gmail.com
पोलीस आपत्कालीन क्रमांक	११२
तक्रार ॲप	महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे "Maha Paryavaran" ॲप

प्रभाग	प्रभाग अधिकारी / भरारी पथक प्रमुख	ई-मेल आयडी	मोबाईल क्रमांक
प्रभाग क्र. ०१	बळवंत बाविस्कर	wo.mmc1@gmail.com	८४२११९३१७०
प्रभाग क्र. ०२	संतोष गायकवाड	mmcofficen002@gmail.com	९९६०१५९७०२
प्रभाग क्र. ०३	जगदीश बडगुजर	w3.mlgmmc@gmail.com	८१८०८१३९५२
प्रभाग क्र. ०४	कादरी अब्दुल अलीम	w04.mmc@gmail.com	९२७२७३२१३२
मुख्य अग्निशमन केंद्र	संजय दादाजी पवार	chieffireofficermmc@gmail.com	९८२३३३९२७५

सर्व नागरिकांनी पर्यावरणपूरक व शांततापूर्ण पद्धतीने सण-उत्सव साजरे करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

उपायुक्त (मुख्यालय)
मालेगाव शहर महानगरपालिका, मालेगाव

जा.क्र. मामनपा/ सं.क.व.वि./ २८८/२०२६दिनांक :- ०६/११/२०२६

प्रति,

संपादक, दैनिक …… (मराठी) / दैनिक …… (उर्दू),
मालेगाव.

वरीलप्रमाणे प्रेस नोट बातमी स्वरुपात मराठी / उर्दू स्थानिक वर्तमान पत्रात विनामूल्य प्रसिद्ध करावी व मालेगाव शहर महानगरपालिकेस सहकार्य करावे.

जनसंपर्क अधिकारी
मालेगाव शहर महानगरपालिका, मालेगाव